# CBSE Class 10 Marathi Answer Key 2022 (May 12)

**MARKING SCHEME**

Secondary School Examination Term — II, 2022

**MARATHI (Subject Code : 009)**

[Paper Code : 8]

**Maximum Mark : 40**

**Instructions :**

1. The marking scheme carries only suggested value points for the answers.
2. These are only Guidelines and do not constitute the complete answers.
3. The students can have their own expression and if the expression is correct, the marks be awarded accordingly.
4. The candidates would be permitted to obtain a photocopy of the Answer Book on request on payment of the prescribed processing fee. All Examiners/Additional Head Examiners/Head Examiners are once again reminded that they must ensure that evaluation is carried out strictly as per value points for each answer as given in the Marking Scheme.
5. All the Head Examiners/Additional Head Examiners/Examiners are instructed that while evaluating the answer scripts, if the answer is found to be totally incorrect, (X) should be marked on the incorrect answer and awarded '0' Marks.

| प्रश्न क्र. | उपप्रश्न | अपेक्षित उत्तर/महत्त्वाचे मुद्दे | गुण |
|---|---|---|---|
| प्र.१ | | **खालील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** | |
| | (अ) | **(खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.)** | ४ |
| | १. | जोतिराव व सावित्रीबाईंनी वसतिगृह चालविले होते, कारण शिक्षणासाठी मुले दूरदूरच्या ठिकाणाहून येत असत, त्यांच्या राहण्या-खाण्याची सोय नव्हती. ती गैरसोय दूर करण्यासाठी त्यांनी वसतिगृह चालविले. | २ |
| | २. | वसतिगृहातील मुलांवर त्या खूप प्रेम करीत. उदार होत्या, अन्नदान करीत, कोणासही जेवू घालीत, फाटकी लुगडी नेसलेल्या गरीब बायकांना स्वतःची लुगडी देत. | २ |
| | ३. | सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्त्व साधी राहणी व उच्च विचारसरणी. सावित्रीबाईंचा पोषाख साधा असे. अलंकार घालत नव्हत्या. गळ्यात एक पोत व मंगळसूत्र असे. कपाळावर मोठे कुंकू लावीत.<br>**किंवा**<br>सावित्रीबाई दयाळू व प्रेमळ अंतःकरणाच्या होत्या, उदार होत्या, सुविचारी व दूरदृष्टीच्या होत्या.<br>(वरीलपैकी कोणतेही एक उत्तर वा दोन्ही उत्तरे असतील तरी उत्तर बरोबर आहे.) | २ |
| | (ब) | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाबद्दल तुमचे विचार व्यक्त करा.**<br>**(टीप — इथे स्वमत विचारले असल्याकारणाने विद्यार्थी स्वतःचे मत मांडू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सकारात्मक वा नकारात्मक विचार ग्राह्य धरले जावे.)**<br>**(इथे दिलेली उत्तरे ही केवळ शिक्षकांना मदतहेतू पुरविलेली आहेत.)** | ३ |
| | १. | 'बरोबर काय न्यायचे आहे,' या प्रश्नातून सावित्रीबाईंना हेच सुचवायचे आहे की, मनुष्य रिकाम्या हाताने जन्म घेतो व जाताना काहीही बरोबर नेत नाही. जे काही कमवितो, ते इथेच सोडून जातो. त्यामुळे माणसाचे अंतःकरण उदार व दयाळू असले पाहिजे. जे आपल्याकडे आहे, ते आपण इतरांना दिले पाहिजे. आपल्या विचारांप्रमाणेच सावित्रीबाई कृतीही करत होत्या. अंगावर फाटकी लुगडी घालणाऱ्या स्त्रियांना त्या लुगडी देत होत्या व गरीबांना अन्नदानही करत होत्या. | ३ |
| | २. | सावित्रीबाईंच्या कार्याचा समाजातील स्त्रियांवर फारच सकारात्मक परिणाम होत असे. मुळातच सावित्रीबाई ह्या दूरदृष्टीच्या होत्या. स्त्रीजातीच्या विकासाची त्यांना तळमळ होती. त्यांनी सुरू केलेल्या स्त्रीशिक्षणाच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये त्यांच्याविषयी पूज्यभाव वाढीस लागला. सामाजिक | ३ |



*These answers are meant to be used by evaluators.

collegedunia
India's largest Student Review Platform

| | | | |
|---|---|---|---|
| | | परिवर्तन झाले. मुली शाळेत जाऊ लागल्या. स्त्रियांची उन्नतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. सावित्रीबाईंनी केलेल्या समुपदेशाने समाजातील स्त्रिया प्रभावित होऊ लागल्या. | |
| प्र.२ | अ | **खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत लिहा. (कोणतेही २)** | ४ |
| | १. | **पाठपरिचय- रंग साहित्याचे**<br>'आत्मचरित्र' हा 'चरित्रा'चाच एक प्रकार. स्वतःच्या जीवनप्रवासाचे व्यक्तीने तटस्थपणे केलेले वर्णन. आपल्या आयुष्यातील विविध टप्पे, वळणे, भलेबुरे अनुभवांचे तटस्थपणे केलेले कथन. त्यातून आत्मचरित्र साकारते. स्वा. सावरकर, सुनीता देशपांडे, दया पवार, डॉ.जयंत नारळीकर इ.ची आत्मचरित्रे लोकप्रिय झाली आहेत. | २ |
| | २. | **पाठपरिचय – ऊर्जाशक्तीचा जागर लेखक – डॉ.रघुनाथ माशेलकर**<br>लेखकाच्या हायस्कूलमध्ये दर शनिवारी चाचणी परीक्षा घेण्यात येत असे. शाळा गरीब असल्यामुळे उत्तरपत्रिका घरूनच न्यावी लागे. तिची किंमत तीन पैसेच होती. मात्र दर आठवड्याला ते तीन पैसे उभे करताना आईच्या डोळ्यांत पाणी येई. | २ |
| | ३. | **पाठपरिचय – खरा नागरिक लेखक – सुहास बारटक्के**<br>पहाटे कोणीतरी रेल्वेरूळ वेडेवाकडे केले असावेत. आगगाडी आली तर भयंकर अपघात होईल. त्यामुळे कानठळ्या बसवणारा आवाज व लोकांच्या किंकाळ्या त्याच्या मनात आल्या. स्टेशनवर सांगायला गेलो तर परीक्षा बुडणार, गुरुजींची मदत, शिक्षण बंद होणार, रेल्वेने फिरायचे स्वप्न अपुरे राहणार......असे अनेक विचार निरंजनच्या मनात आले. | २ |
| | ४. | **पाठपरिचय – रंग साहित्याचे**<br>कविता –<br>१. छोटीशी व आटोपशीर.<br>२. मोजक्या शब्दांत मोठा आशय व्यक्त करणारी.<br>३. शब्दालंकार व अर्थालंकाराने सजलेली.<br>४. आशयगर्भ व शब्दरचना चपखल.<br>५. कल्पनांचा सुंदर आविष्कार.<br>६. मनातील भावना नेमकेपणाने व्यक्त करण्याचा गुण कवितेला इतर साहित्यप्रकाराहून वेगळा ठरवतो.<br>७. गाण्यात रुपांतर, पाठ्यपुस्तकात वाचू शकतो, सीडीमध्ये ऐकू शकतो, तर चित्रपटात कविता ऐकू व पाहू शकतो.<br>८. संतकाव्यापासून सुरू झालेला हा प्रवास मुक्त छंदापर्यंत येऊन पोहोचतो.<br>(टीप – वरीलपैकी कोणतेही ४ मुद्दे असल्यास पूर्ण गुण द्यावेत.) | २ |
| | (ब) | **खालील प्रश्नांची सुमारे ५० ते ६० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | ६ |
| | १. | शाळेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. शालेय अभ्यासक्रमातील विविध विषयांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. भाषेमुळे मूल्यसंस्कार विकसित होतात. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, सहकार्य भावना वाढीस लागते. चांगले आरोग्य लाभते. बाल्यावस्थेपासून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना शालेय प्रांगणात वाव मिळतो. तसेच स्वच्छता, टापटीपपणा, निर्णयक्षमता, प्रसंगावधान हे गुण अंगी बाणतात. | ३ |
| | २. | **पाठपरिचय – रंग साहित्याचे**<br>'रंग साहित्याचे' या पाठात कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र व प्रवासवर्णन इ. साहित्यप्रकार आलेले आहेत.<br>नाटकाची वैशिष्ट्ये – १. पात्ररचना व चुरचुरीत संवाद.<br>२. नाट्यमय घटना, प्रसंग, रंगमंचावरील सादरीकरण.<br>३. दिग्दर्शक ते नाटक श्रवणीय व प्रेक्षणीय करतो.<br>बालनाट्य हा उपप्रकार : गोविंद बल्लाळ देवल, पु.ल.देशपांडे, प्र.के अत्रे यांसारखे उत्तम नाटककार प्रसिद्ध. | ३ |



*These answers are meant to be used by evaluators.

collegedunia.com
India's largest Student Review Platform

| | | | |
|---|---|---|---|
| | | (वरीलप्रमाणे विद्यार्थी कोणत्याही एका साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये लिहितील.) | |
| | ३. | नागरिकशास्त्राला शालेय अभ्यासक्रमात अनन्यसाधारण महत्त्व आहे. नागरिकशास्त्र हा केवळ एक विषय नसून प्रत्येक नागरिकाने आचरणात आणायचे शास्त्र आहे. नागरिकशास्त्र या विषयामुळे नागरिकांना देश, समाज याबाबतची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व हक्क समजतात. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, गाव, जिल्हा, शहराचा कारभार कसा चालतो, हे समजणे . मतदान पद्धतीची माहिती व मूलभूत हक्क यांची जाणीव होणे, कायदा व सुव्यवस्था कशी राखावी, याचे ज्ञान मिळते. या विषयाद्वारे उत्तम नागरिक घडविण्याचे कार्य घडते. (याव्यतिरिक्तही मुलांची वेगळी मते असू शकतात. तीही ग्राह्य धरावी.) | ३ |
| **प्र.३** | (अ) | **खालील प्रश्नांची सुमारे ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही २)** | **४** |
| | १. | **काव्यपरिचय – स्वप्न करू साकार** **कवी – किशोर पाठक**<br>आपला देश विविधतेने नटलेला. देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न साकारण्यासाठी कृषिसंस्कृती व श्रमप्रतिष्ठा या मूल्यांसोबत एकात्मता, शौर्य, ताकद, पराक्रम, तेजाचे व एकजुटीचे दर्शन घडते. हा सकारात्मक दृष्टिकोन, नव्या पिढीचे व नव्या युगाचे स्वप्न 'आम्ही' मिळून साकार करू असा निर्धार व्यक्त करतात. एकात्मतेचे सामर्थ्य सूचित करतात. | २ |
| | २. | **काव्यपरिचय – औक्षण** **कवयित्री – इंदिरा संत**<br>स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता, शौर्याने व जिद्दीने पुढे जाणारे सैनिक, त्यांचे रणांगणावरील यश डोळे भरून पाहणारी दीनदुबळी जनता. आपल्या डोळ्यांतील आनंदाश्रूंनी सैनिकांचे औक्षण करतात, ज्यामुळे त्यांचे रक्षण होते व त्यांच्याविषयी कृतज्ञतेची व आदराची भावना व्यक्त होते. | २ |
| | ३. | **काव्यपरिचय – औक्षण** **कवयित्री – इंदिरा संत**<br>सैनिकांनी देशासाठी दाखविलेल्या शौर्य व कर्तृत्वापुढे आपण अगदीच दीनदुबळे व सामान्य आहोत, ही भावना कवयित्रीच्या मनात आहे. सैनिकांना देण्यासाठी दीनदुबळ्यांच्या शिरेत सामर्थ्य नाही, मुठीत धन नाही. त्यांचा जीव इतका लहान आहे की तो ओवाळून टाकला तरी सैनिकांच्या पराक्रमापुढे तो अत्यंत क्षुद्र आहे. | २ |
| | (ब) | **खालील पद्यपंक्तीचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा. (कोणतेही १)** | **३** |
| | १. | **संदर्भ** – वरील पद्यपंक्ती या '**औक्षण**' या कवितेतील असून कवयित्री '**इंदिरा संत**' आहेत. या कवितेत कवयित्रीने सैनिकांच्या पराक्रमाचे कौतुक करून त्यांच्याविषयी कृतज्ञतेचा भाव व्यक्त केला आहे.<br>**स्पष्टीकरण** – कवयित्री सैनिकांना उद्देशून म्हणते की, रणांगणावर जाण्यासाठी सुसज्ज झालेल्या सैनिका, तुझा पराक्रम, तुझे शौर्य, तुझी विजय मिळवल्यानंतरची घोडदौड डोळे भरून पाहण्याची माझी इच्छा आहे. त्यासाठी माझ्या डोळ्यांतील अश्रूंच्या ज्योतींनी मी तुझे औक्षण करत आहे.<br>**वैशिष्ट्ये** – वरील ओळीतून व्यक्त होणारा आशय सैनिकांविषयीचा अभिमान असणाऱ्या सर्वसामान्य देशवासियांच्या भावना समर्पक शब्दांत मांडतो. | ३ |
| | २. | **संदर्भ** – वरील पद्यपंक्ती या '**स्वप्न करू साकार**' या कवितेतील असून कवी '**किशोर पाठक**' आहेत. या कवितेत कवीने देशाच्या उज्ज्वल भविष्याचे वर्णन केले आहे.<br>**स्पष्टीकरण** – या कवितेत कृषिसंस्कृतीचे वर्णन करतांना कवी म्हणतात, की या देशात उगवणारी फुले, येथील मुले यांच्या प्रसन्नतेतून जणू श्रावण फुलतो व येथील माती मंगलमय होते. मातीतून मिळणाऱ्या अन्नाने तनामनाचे पवित्र पोषण होते. सर्वत्र चैतन्यमयी वातावरण असते. शेतकरी येथील सुजलाम्, सुफलाम धरतीतून धान्यरुपी धन प्रचंड प्रमाणात भरभरून पिकवतो.<br>**वैशिष्ट्ये** – वरील पंक्ती कृषिसंस्कृतीचे महत्त्व पटवून देतात. | ३ |
| | (क) | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे ५० ते ६० शब्दांत उत्तर लिहा.** | **३** |
| | १. | '**व्युत्पत्ती** म्हणजे शब्दाच्या अर्थाचे किंवा शब्दाच्या मुळाचे ज्ञान.'<br>भाषेमध्ये इतिहासाच्या दृष्टीने बदल होतात. सुलभीकरणाच्या प्रक्रियेमुळे बदल होतात. काळानुसार बदल होतात. अर्थात, परस्पर संबंधात बदल होत जातात. पूर्वीचा अर्थ हळूहळू बदलत जातो. अन्य | ३ |



*These answers are meant to be used by evaluators.

collegedunia
India's largest Student Review Platform

| | | | |
|---|---|---|---|
| | | भाषेत तो शब्द कसा आला आहे, शब्दामागचा इतिहास, वेगळी व्युत्पत्ती असेल तर इ. विषयीची माहिती दिलेली असते. | |
| | २. | मराठी भाषेत 'आग' हा शब्द संस्कृत भाषेतील 'अग्नि' या शब्दापासून आला. 'अग्नि'पासून 'आग' हा शब्द तयार होण्यापूर्वी प्राकृतमध्ये 'अग्गि' हा शब्द तयार झाला. हाच उच्चार सोपा होत होत मराठी, हिंदी यांसारख्या आधुनिक भाषांत त्यापासून 'आग' हा शब्द तयार झाला. | ३ |
| **प्र.४** | **अ** | **कंसातील सूचनांनुसार उत्तरे द्या. (कोणतेही १)** | **२** |
| | १. | मैत्रीण – सामान्य नाम<br>सारंग – विशेष नाम | २ |
| | २. | मुलांनी आपली काळजी घेतली **म्हणून** आपला प्रवास सुखाचा झाला.<br>**किंवा**<br>आपला प्रवास सुखाचा झाला **कारण** मुलांनी आपली काळजी घेतली.<br>**किंवा**<br>मुलांनी आपली काळजी घेतली **त्यामुळे** आपला प्रवास सुखाचा झाला. | २ |
| | ३. | कवी – कवयित्री (विरुद्धलिंगी शब्द) | २ |
| | **(ब)** | **कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा. (कोणतेही १)** | **२** |
| | १. | वर्तमानकाळ – लिहीत होती, लिहिली, लिहिली होती, लिहीत असे. | २ |
| | २. | भूतकाळ – गाईन, गाईल, गात असेल. | २ |
| | ३. | भविष्यकाळ – वाजते, वाजत आहे, वाजत असते. | २ |
| | **(क)** | **कंसातील सूचनेनुसार बदल करून लिहा. (कोणतेही १)** | **२** |
| | १. | विधानार्थी – सर्वांनी आरोग्याची काळजी घ्या. | २ |
| | २. | प्रश्नार्थी – तू आज कामावर येत आहे./तू आज कामावर यायला हवे./तू आज कामावर यायला पाहिजे./यावेस./येणार नाही. | २ |
| | ३. | आज्ञार्थी – आज तू स्वयंपाक करणार नाहीस का?/आज तू स्वयंपाक करतेस का?/आज तू स्वयंपाक करशील का?/ आज तू स्वयंपाक करशील? | २ |
| | ४. | विधानार्थी – अरेवाह!, अरे बापरे!, अरेच्चा!, अबब!, वाह! | २ |
| | **(ड)** | **खालील सामासिक शब्दांचा योग्य विग्रह करून समास ओळखा.<br>(कोणतेही १)** | **२** |
| | १. | आजन्म – जन्मापासून – अव्ययीभाव समास | २ |
| | २. | नवरात्र – नऊ रात्रींचा समूह – द्विगू समास | २ |
| | ३. | भाजीपाला – भाजी, पाला वगैरे – समाहार द्वंद्व समास | २ |
| **प्र.५** | | **खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा. (लिफाफा आवश्यक)** | **५** |
| | | पत्रलेखनासाठी आवश्यक बाबी –<br>१. दिनांक – पत्राच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात लिहावा.<br>२. मायना – ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे अभिवादनासह संबोधित करावे.<br>३. विषय – मोजक्या शब्दांत असावा.<br>४. मजकूर – विषयाशी संबंधित, त्रोटक व नेमका असावा. समर्पक, मुद्देसूद रचना असावी. पाल्हाळ नसावा. भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी.<br>५. शेवट व स्वाक्षरी – पत्राच्या शेवटी डावीकडे खालच्या कोपऱ्यात पत्र पाठविणाऱ्याची स्वाक्षरी व पत्ता ईमेलसह.<br>६. लिफाफा – प्रति, प्रेषक व तिकीट. | <br>०.५<br>१<br>०.५<br>१.५<br><br>०.५<br><br>१ |

(**महत्त्वाची सूचना** – वरील उत्तरपत्रिका शिक्षकांच्या संदर्भासाठी तयार केली आहे. तरी भाषा विषय असल्यामुळे विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे, मांडलेले विचार मुद्देसूद व समर्पक असतील तर त्या अनुषंगाने गुणदान करण्यात यावे.)



*These answers are meant to be used by evaluators.

collegedunia.com
India's largest Student Review Platform